# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.
## नगरसचिव कार्यालय

**महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एम.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकाराचा वापर करुन मा.प्रशासक यांनी मंजूरी दिलेले दिनांक ०४/०२/२०२५ चे ठराव**

---

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ८३८** **विषय क्रमांक - ८३८**

**दिनांक - ०४/०२/२०२५** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ८३८<br>दिनांक -<br>०४/०२/२०२५ | मा.क्षेत्रीय अधिकारी, आरोग्य ब क्षेत्रीय यांचेकडील पत्र क्र.बक्षेका/६/कावि/३६/२०२५ दि.२७/०१/२०२५ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.४७९३ दि.२८/०१/२०२५ अन्वये, शहरातील वापरात नसलेले अथवा दुरावस्थेत अथवा मोडकळीस अवस्थेत (Dialpted Condition) तसेच कमी वापर होत असणारे सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांचा सर्व्हे करुन निष्कासित करणेस मान्यता देणे बाबत. |
| ठराव क्र. ८३८<br>दिनांक -<br>०४/०२/२०२५ | मा.क्षेत्रीय अधिकारी, आरोग्य ब क्षेत्रीय यांचेकडील पत्र क्र.बक्षेका/६/कावि/३६/२०२५ दि.२७/०१/२०२५ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.४७९३ दि.२८/०१/२०२५ अन्वये, स्वच्छ महाराष्ट्र / भारत अभियान (नागरी) प्रकल्प अंमलबजावणी कक्षाकडील मा.आयुक्त सो. यांचे स्वमअक/३/कावि/१५५/२०२३, दिनांक-१६/१०/२०२३ आदेशान्वये कळविलेनुसार केंद्र शासनाचे स्वच्छ भारत अभियान (नागरी) च्या धर्तीवर राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) राबविणेत येत आहे. नागरिकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे आणि सर्व नागरिकांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन देणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. त्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिका सदर सर्वेक्षणामध्ये दरवर्षी सहभागी होत असते. मा.आयुक्त सो. यांनी सार्वजनिक व सामुदायिक शौचालय आढावा बैठकीमध्ये वेळोवेळी सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांचा सर्वे करून वापरात नसलेले शौचालय निष्कासित करण्याचे निर्देश दिलेले आहे. स्वच्छ सर्वेक्षणातील ओडीएफ, ओडीएफ++, वॉटर+ याकरिता सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांच्या स्वच्छतेचे मुल्यांकन करण्यात येते. शहरातील एकुण सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांपैकी काही शौचालये ही सिटी प्रोफाईलमध्ये नोंदविणेत आलेली आहेत. त्यामुळे शहरातील जी सार्वजनिक अथवा सामुदायिक शौचालये ज्यांचा अजिबातच वापर होत नाही अथवा दुरावस्थेत अथवा मोडकळीस अवस्थेत (Dialpted Condition) आलेली आहेत त्यांचा सर्व्हे करून सदर शौचालये निष्कासित करणे आवश्यक आहे. त्यानुसार "ब" क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील जी सार्वजनिक अथवा सामुदायिक शौचालये ज्यांचा अजिबातच वापर होत नाही अथवा दुरावस्थेत अथवा मोडकळीस अवस्थेत (Dialpted Condition) आलेली आहेत तसेच कमी वापर होत असल्याने अतिरिक्त शौचालय सिट्स कमी करणेचा सर्व्हे करणेत आला असून तो पुढीलप्रमाणे आहेत. |

| प्रभाग क्र. | शौचालयाचे ठिकाण | ब्लॉक संख्या | सिट्स संख्या | निष्कासित करण्याचे कारण | जागेचा वापर |
|---|---|---|---|---|---|
| १६ | पंचशील | १ | १४ | सदर ठिकाणी वापर कमी होत असल्याने | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | चौक, किवळे | | | तरंगत्या लोकसंख्येच्या वापरासाठी पुरुष शौचालयाचे ५ सिटस कमी करुन एका बाजुस मुतारीची व्यवस्था करणे. तसेच बाहेरील वॉश बेसीन काढुन आतील बाजुस बसविणे. महिलांचे शौचालयाचे ३ सिटस असे एकुण ८ सिटस कमी करुन तेथे आवश्यक सुविधा उपलब्ध करणे (वेडींग मशिन/ बेसिन) | |
| १७ | वाल्हेकरवाडी हॉस्पीटल मागे | १ | १८ | सदर ठिकाणी वापर कमी होत असल्याने प्रत्यक्ष structure चे रचनेनुसार कमी करावयाची ९ सिटस संख्या प्रस्तावित करणेत आली आहे. प्रस्तावित प्रमाणे रिकाम्या होणा-या जागेत अनुषंगिक सुविधा उपलब्ध करणेत येतील | आरोग्य विभागासाठी कार्यालय अथवा गोडाऊन (स्टोअर रुम) बांधणेची कार्यवाही करणेत येईल |
| १८ | पंढरीचा मळा, जलतरण तलावाचे शेजारी, चिंचवड | ५ | ५८ | सदर ठिकाणी वापर कमी होत असल्याने एकुण ५८ सिटसची आवश्यकता नसल्याने ४७ सिटस पाडुन रिकामी होणारी जागा आरोग्य विभागाचे गोडाऊन बांधणेची कार्यवाही करणेत येईल. | आरोग्य विभागासाठी गोडाऊन बांधणेची कार्यवाही करता यईल |
| १८ | केशवनगर शाळेच्या मागे | २ | ३६ | सदर ठिकाणी वापर कमी होत असल्याने एकुण ३६ सिटसची आवश्यकता नसल्याने २४ सिटस पाडुन रिकामी होणारी जागा अंशत: बंदिस्त करणे व काही जागा अनुषंगिक सुविधा उपलब्ध करणेसाठी वापरणेत येईल. आरोग्य विभागाचे गोडाऊनसाठी वापरणे प्रस्तावित आहे. | आरोग्य विभागासाठी गोडाऊन बांधणेची कार्यवाही करता यईल |
| १८ | भिमनगर | ४ | १५ | एकुण १५सिटसची आवश्यकता नसल्याने ७ सिटस पाडुन रिकामी होणारी जागेत परिसर सुशोभिकरण करणेत येईल. | रिकामी होणा-या जागेत परिसर सुशोभिकरण करणे |
| | एकूण | १३ | १४१ | | |

उक्त प्रमाणे 'ब' क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील मनपा शौचालये निष्कासित करावयाची असून आरोग्य मुख्य कार्यालय यांचेकडील पत्र क्र.स्वमअक/३/कावि/१४२/२०२४, दि.१९/१२/२०२४ अन्वये कळविलेनुसार महापालिकेच्या जागेवरील CT/PT/Urinals निष्कासित करणेस मा.महापालिका सभेची मान्यता देणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| | |
|---|---|
| निर्णय | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ८३९** **विषय क्रमांक - ८३९**

**दिनांक - ०४/०२/२०२५** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ८३९ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.भा.आ./पापु प्रकल्प/२/७७/२०२५ दि.२७/०१/२०२५ आणि मा.स्थायी समिति अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव |

| | |
|---|---|
| दिनांक - ०४/०२/२०२५ | क्र.४७९६ दि.२८/०१/२०२५ अन्वये, मनपाचे पाणी पुरवठा विभागातील कार्यकारी अभियंता यांना कामकाजाकरीता स्वंतत्र बैठक व्यवस्था करणेकामी स्थापत्य विभागातील कामात व पाणीपुरवठा विभागाच्या कामांच्या तरतूदीमध्ये वाढ-घट करणेस मान्यता देणे बाबत. |
| ठराव क्र. ८३९ दिनांक - ०४/०२/२०२५ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र.भा.आ./पापु प्रकल्प/२/७७/२०२५ दि.२७/०१/२०२५ आणि मा.स्थायी समिती अधिकारांतर्गत मा.प्रशासक यांजकडील ठराव क्र.४७९६ दि.२८/०१/२०२५ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पहिल्या मजल्यावर मा.मुख्य अभियंता(१) यांचे कार्यालय असुन त्यांचेकडे पाणी पुरवठा व स्थापत्य विभागाचा कार्यभार आहे. पाणी पुरवठा विभाग मुख्य कार्यालयात एकूण ४ कार्यकारी अभियंता व १ सह शहर अभियंता कार्यरत आहेत. सद्यस्थितीत सदर कार्यालयामध्ये सह शहर अभियंता व २ कार्यकारी अभियंता यांना कार्यालयीन कामकाज पाहण्याकरीता स्वंतत्र कक्ष आहेत. उर्वरित २ कार्यकारी अभियंता यांना बसण्याकरिता कक्ष उपलब्ध नाहीत. सद्यस्थितीत पाणी पुरवठा विभागाकडील कार्यालयामध्ये उपलब्ध असलेल्या जागे मध्ये नव्याने संरचना करुन एकूण ४ कार्यकारी अभियंता यांना कामकाजाकरिता स्वतंत्र बैठक व्यवस्था करणे शक्य आहे. स्थापत्य मुख्य कार्यालयाकडे फर्निचरचे काम चालू असून, सदर कामातून उपरोक्त नमूद केल्या प्रमाणे बैठक व्यवस्थेचे काम करणेत येणार आहे. तथापि सदर कामावर पुरेशी तरतूद उपलब्ध नाही. तरी पाणीपुरवठा विभागाकडील चालू असलेल्या कामांमधून स्थापत्य विभागाकडील चालू असलेल्या फर्निचरच्या कामावर सदर बैठक व्यवस्था करणेचे काम करणेकरीता सोबत जोडलेल्या प्रपत्र-अ मध्ये नमूद केलेल्या कामांसमोरील स्तंभात दर्शविल्याप्रमाणे मनपाच्या सन २०२४-२५ च्या अंदाजपत्रकातील उपलब्ध तरतूद कमी पडत असल्याने वाढ/घट करणेस मा.महापालिका सभेची मान्यता देणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ८४०** **विषय क्रमांक - ८४०**

**दिनांक - ०४/०२/२०२५** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ८४० दिनांक - ०४/०२/२०२५ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्रक्र.झोनिपु /स्था/१०/कावि/२८/२०२५, दिनांक.२३/०१/२०२५ अन्वये, मौजे आकुर्डी स.नं. ८८ पैकी सि.स.नं. ५३८६ पैकी येथील अजंठानगर झोपडपट्टी येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प राबविण्याचा प्रस्ताव मंजुर असून सदर मिळकतीवर असलेले पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे स्वच्छतागृह व अनुषंगिक सुविधा निष्कासित करणेस मान्यता देणे बाबत. |
| ठराव क्र. ८४० दिनांक - ०४/०२/२०२५ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्रक्र.झोनिपु /स्था/१०/कावि/२८/२०२५, दिनांक.२३/०१/२०२५ अन्वये, तसेच सदर प्रकल्पाचे विकसक मे. आर.के. डेव्हलपर्स यांनी सदर ठिकाणी पुनर्वसन प्रकल्प करणेकरिता झोपडपट्ट्यां निष्कासित केल्या असून त्या ठिकाणचे शौचालय निष्कासित करणेबाबत या विभागास व फ क्षेत्रिय कार्यालयास त्यांचे दि. ०१/०१ /२०२५ च्या पत्रान्वये कळविले आहे.त्याप्रमाणे सदर पत्रावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी असे क्षेत्रिय अधिकारी, 'फ' क्षेत्रिय कार्यालय यांनी त्यांचे दि. १७/१/२०२५ च्या पत्रान्वये कळविले आहे. तसेच झोनिपु विभागाकडील दि. २१/१/२०२५ चे पत्राच्या |

| | |
|---|---|
| | अनुषंगाने उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र. ३, झोनिपु पुनर्वसन प्राधिकरण पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र यांनी त्यांचे दि. २३/१/२०२५ चे पत्रानुसार विषयांकित योजनेचा प्रस्ताव विकसक मे. आर.के.डेव्हलपर्स यांचेमार्फत दाखल आहे. सदर योजनेचा कलम ३ ड अंतर्गत झोपडपट्टी निर्मुलन आदेश दि. १९/०१/२०२४ रोजी प्रसिध्द करणेत आला आहे. सदर आदेशाच्या अनुषंगाने स्वेच्छेने स्थलांतरीत न झालेल्या ५२ झोपडीधारकांची निष्कासन कारवाई दि. २३/१२/२०२४ रोजी या कार्यालयामार्फत करणेत आलेली आहे. उक्त जागेवर आपले विभागामार्फत बांधणेत आलेले सार्वजनिक शौचालय आजमितीस जागेवर आहे. त्यामुळे सदर जागेवरील अस्तित्वात असलेल्या शौचालयाबाबतची पुढील योग्य ती कार्यवाही आपले विभागामार्फत करणेत यावी, असे कळविले आहे. सदर ठिकाणी SRA मार्फत मे. आर.के. डेव्हलपर्स यांनी सादर केलेल्या पुनर्वसन प्रकल्पाचे काम करणेचे योजनेस झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र यांचेकडील जा.क्र.झोपुप्रा/तां -३/ ७५०/२०२३, दि. ०४/०५/२०२३ अन्वये प्रशासकिय मान्यता आदेश दिले असून त्याप्रमाणे झोपड्यांची बांधकामे निष्कासित केली असल्याने सध्या तेथील नागरिक स्थलांतरीत झालेले आहेत. त्यामुळे मनपाने बांधलेल्या शौचालयाचा वापर होत नाही. त्यामुळे सदरचे मनपाचे जुने शौचालय निष्कासित करणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ८४१** **विषय क्रमांक - ८४१**

**दिनांक - ०४/०२/२०२५** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ८४१<br>दिनांक -<br>०४/०२/२०२५ | मा.क्षेत्रीय अधिकारी, आरोग्य क क्षेत्रीय यांचेकडील पत्र.क्र.कक्षेका/आ१५ब/कावि/६९/२०२५ दि.०३/०२/२०२५ अन्वये, शहरातील वापरात नसलेले अथवा दुरावस्थेत अथवा मोडकळीस अवस्थेत (Dilated Condition) असणारे सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांचा सर्व्हे करुन निष्कासित करणेस मान्यता देणे बाबत. |
| ठराव क्र. ८४१<br>दिनांक -<br>०४/०२/२०२५ | मा.क्षेत्रीय अधिकारी, आरोग्य क क्षेत्रीय यांचेकडील पत्र.क्र.कक्षेका/आ१५ब/कावि/६९/२०२५ दि.०३/०२/२०२५ अन्वये, स्वच्छ महाराष्ट्र / भारत अभियान (नागरी) प्रकल्प अंमलबजावणी कक्षाकडील मा. आयुक्त साहेब यांचे स्वमअक/३/कावि/१५५/२०२३, दिनांक -१६/१०/२०२३ चे आदेशान्वये कळविलेनुसार केंद्र शासनाचे स्वच्छ भारत अभियान (नागरी) च्या धर्तीवर राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) राबविणेत येत आहे. नागरिकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे आणि सर्व नागरिकांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन देणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. त्यानुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिका सदर सर्वेक्षणामध्ये दरवर्षी सहभागी होत असते. मा. आयुक्त सो. यांनी सार्वजनिक व सामुदायिक शौचलय आढावा बैठकीमध्ये वेळोवेळी सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांचा सर्व्हे करुन वापरात नसलेले शौचालय निष्कासित करण्याचे निर्देश दिलेले आहे. स्वच्छ सर्वेक्षणातील ओडीएफ, ओडीएफ++, वॉटर+ याकरिता सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांच्या स्वच्छतेचे मुल्यांकन करण्यात येते. शहरातील एकुण सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांपैंकी काही शौचालये ही सिटी प्रोफाईलमध्ये नोंदविणेत आलेली आहेत. त्यामुळे शहरातील जी सार्वजनिक अथवा सामुदायिक शौचालये ज्यांचा अजिबातच वापर होत नाही अथवा दुरावस्थेत अथवा मोडकळीस अवस्थेत (Dilated Condition) |

आलेली आहेत त्यांचा सर्व्हे करुन सदर शौचालये निष्कासित करणे आवश्यक आहे.त्यानुसार “क” क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील जी सार्वजनिक अथवा सामुदायिक शौचालये ज्यांचा अजिबातच वापर होत नाही अथवा दुरावस्थेत अथवा मोडकळीस अवस्थेत (Dilated Condition) आलेली आहेत त्यांचा सर्व्हे करणेत आला असून ती पुढीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र | प्रभाग क्र | शौचालयाचे/ मुतारी नाव | ब्लॉक | सिट्स | | एकुण | निश्कसित करणेबाबतचे कारण | जागेचा वापर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | स्त्री | पुरुष | | | |
| १ | २ | फायर कार्यालय बाहेरील बाजु | १ | १ | १ | २ | वापर होत नाहीं ६० मीटर अंतरावर फायर कार्यालयमध्ये शौचालय उपलब्ध आहे | फायबर सिट आहे आणि फुटपाथवर आहे. |
| २ | २ | सावतामाळी मंदिर मागील बाजु | २ | १२ | १२ | २४ | ड्रेनेज लाईन नस्ल्यामुळे तसे सदर शैचालयाचे वापर कमी प्रमाणाण असुन २०० मी. अंतरावर पर्यायी व्यवस्था | आरोग्य विभागासाठी कार्यालय बांधूणेची कार्यवाही करणेत येईल. |
| ३ | २ | ई टॉयलेट | १ | १ | १ | २ | सदर ठिकाणी विद्युत व पाणी साठा कोणतीही व्यवस्था उपलब्ध नाही | फुटपाथवर आहे. |
| ४ | २ | रोकडेवस्ती, जवळ चिखली | २ | ९ | ९ | १८ | ड्रेनेज लाईन उपलब्ध नसल्यामुळे, कमी प्रमाणात नागरिकांचा वापर, सुलभ शौचालय उपलब्ध | नाल्याच्या प्रवाहमध्ये येत आहे. |
| ५ | २ | महादेव मंदिर रोकडेवस्ती | १ | ४ | ४ | ८ | ड्रेनेज लाईन उपलब्ध नसल्यामुळे, कमी प्रमाणात नागरिकांचा वापर, सुलभ शौचालय उपलब्ध - | अद्यावत सुलभ शौचालय सेप्टीक टँक किवा ड्रेनेज लाईन टाकून मिळावे. व्यापारी वर्गास वापर कर्ता येईल. |
| ६ | २ | ताजणे यांच्या घराजवळ संजयगांधीनगर | १ | १० | ० | १० | कमी प्रमाणात वापर असल्यामुळे, शेजारी सुलभ शौचालय उपलब्ध | आरोग्य विभागासाठी कार्यालय बांधूणेची कार्यवाही करणेत येईल |
| ७ | ६ | गुळवेवस्ती डि पी लगत | १ | ० | ६ | ६ | वापर न होत असल्यामुळे बंद आहे | आरोग्य कार्यालय बांधून मिळावे. |
| ८ | ८ | से.नं. ०७ यशवंतराव चव्हाण चौक | १ | ० | २ | २ | मोडकळिस अवस्था असल्यामुळे व वापर बंद असल्यामुळे | फुटपाथवर आहे. |
| ९ | ९ | पाटील दवाखाना खराळवाडी | १ | १० | १० | २० | सदर शौचालयाचा कमी प्रमाणात वापर | अंगणवाढी बनविता येईल |
| १० | ९ | सोनारुपा बिल्डींगसमोर खराळवाडी | १ | १२ | १२ | २४ | बहुतांश भाग सोसायटीचे असुन सदर शौचालयाचा कमी प्रमाणात वापर आहे | वाचनायल बनविता येईल |
| ११ | ९ | शेंडगेवखार खाणीजवळ खराळवाडी | २ | २६ | १८ | ४४ | कमी प्रमाणात वापर असल्यामुळे पर्यायी व्यवस्था उपलब्ध | आरोग्य विभागासाठी आरोग्य कोठी बनविता येईल. |
| १२ | ९ | वरदहस्त गांधीनगर | १ | २ | २ | ४ | सदर शौचालय है मुख्य रस्त्यालगत आहे, अज्ञात ईसमांकडून वारंवार तोडफोड होत आहे त्यामुळे वापर कमी. | चौक असल्या कराणाने सुशोभिकरण करता येईल. |
| १३ | ९ | ववले गार्डन खराळवाडी | १ | ० | १ | १ | अज्ञात ईसमांकडून वारंवार तोडफोड होत आहे त्यामुळे | गार्डन ओपन जिम बनविता येईल. |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | वापर कमी. | |
| १४ | ९ | भागवत गीता मंदिराजवळ खराळवाडी | १ | १३ | १३ | २६ | सदर शौचालय शेजारी सुलभ शौचालय आहे त्यामुळे वापर कमी प्रमाणात आहे. | सांस्कृतिक भवन बनविता येईल. |
| १५ | ९ | विठ्ठलनगर झोपडपट्टी डोंगरेचाळ नेहरुनगर | १ | ४ | ४ | ८ | कमी प्रमाणात वापर असल्यामुळे तसेच १०० मी अंतरावर शौचालयाची व्यवस्था आहे | अंगणवाडी बनविता येईल. |
| १६ | ९ | विठ्ठलनगर झोपडपट्टी वाल्मिकी चाळ नेहरुनगर | १ | ५ | ५ | १० | संदर शौचालय नाल्याच्या आतमध्ये असुन जुने बांधकाम आहे सदर ठिकाणी नाला साफसफाई करणेस अडथळा मिर्माण होत आहे. | नाल्याच्या आतमध्ये बांधण्यात आले आहे. निष्कासित करणे. |
| १७ | ९ | नुरमोहल्ला वस्ती नेहरुनगर | १ | ५ | ५ | १० | शौचालय शेजारी सुलभ शौचालयाची व्यवस्था आहे त्यामुळे वापर कमी. | अंगणवाडी बनविता येईल |
| १८ | ९ | शंकरमंदिर नाल्यालगत | १ | ४ | ४ | ८ | वापर कमी प्रमाणात असल्यामुळे | आरोग्य विभागासाठी आरोग्य कोठी बनविता येईल. |
| एकुण | | | २१ | ११८ | १०९ | २२७ | | |

उक्त प्रमाणे क क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील मनपा शौचालये निष्कासित करावयाची असून मा. सहा. आयुक्त आरोग्य मुख्य कार्यालय यांचेकडील पत्र क्र. स्वमअक/३/काव‍ि/१४२/२०२४, दि. १९/१२/२०२४ अन्वये, कळविलेनुसार महापालिकेच्या जागेवरील शौचालयाचे/ मुतारी निष्कासित करणेकामी तसेच त्या जागेचा कोणत्या कारणासाठी वापर करणार असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे.

| | |
|---|---|
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ८४२** **विषय क्रमांक - ८४२**

**दिनांक - ०४/०२/२०२५** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ८४२<br>दिनांक -<br>०४/०२/२०२५ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र. इ/स्था/कावि/०१/६९/२०२५ दि.२८/०१/२०२५ अन्वये, ‘पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे बोपखेल येथील हेमीस्फिअर प्रॉपर्टीज इंडिया लि.(भारत सरकार उपक्रम) या परिसरातील मंजूर रेखांकनास पायाभूत सुविधा (रस्ते, सीमाभिंत) व भूखंड विकसित करणे” या कामासाठी स्वतंत्र लेखाशिर्षक (Budget Head ) करणेस मान्यता देणे बाबत. |
| ठराव क्र. ८४२<br>दिनांक - | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र. इ/स्था/कावि/०१/६९/२०२५ दि.२८/०१/२०२५ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे बोपखेल येथील मे. हेमिस्फिअर प्रॉपर्टीज इंडिया लि. (भारत सरकार उपक्रम) या परिसरातील नं. १३३,१३६ ते १४१ पै. |

| | |
|---|---|
| ०४/०२/२०२५ | येथील भूखंडास बांधकाम परवानगी विभागाकडून सुधारीत रेखांकनास (Layout) मंजूरी देणेत आलेली आहे.तथापि भारत सरकार उपक्रमित मे. हेमिस्फिअर प्रॉपर्टीज इंडिया लि.यांनी त्यांचे अस्थापनाकडे स्थापत्य विषयक तांत्रिक अधिकारी व कुशल कर्मचारी वर्ग नसलेने सुविधा भुखंड क्षेत्र (Amenity plot ) व उर्वरीत मंजूर रेखांकनाचे क्षेत्रास पायाभुत सुविधा (Infrastructure Facility ) जसे की रस्ते, विद्युत वाहिन्या , जलनि:सारण, पाणीपुरवठा व भुखंडाचे समतलीकरण इ. विकसित करणेकामी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे विनंती केलेली असून त्याचा येणारा खर्च त्यांचे आस्थापनास कळविणेस विनंती केलेली आहे. उक्त अन्वये सुविधा क्षेत्राचे व उर्वरीत मंजूर रेखांकन भुखंडास पायाभुत सोयीसुविधा पुरविणेकामी या कामाचे अंदाजपत्रक इकडील विभागामार्फत तयार केले असून अंदाजपत्रकीय र.रु. ३९,६७,७५,५८७/- इतकी येत असून सदरची रक्कम मनपा कोषागारात भरलेनंतर पुढील योग्य ती कार्यवाही करणेत येईल असे संबंधितांना कळविणेत आलेले आहे. या अनुषंगाने ‘पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे बोपखेल येथील हेमीस्फिअर प्रॉपर्टीज इंडिया लि.( भारत सरकार उपक्रम ) या परिसरातील स.नं.१३३,१३६ ते १४१ पै.मधील मंजूर रेखांकनास पायाभूत सुविधा रस्ते, सीमाभिंत व भूखंड विकसित करणे”. या कामाचा सन २०२४-२५ चे मुळ अंदाजपत्रकात विशेष योजना या लेखाशिर्षात तरतूद वाढ व घटीसह मा.महापालिका ठराव क्र. ८०२,दि.१०/१२/२०२४ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे.<br><br>तथापि मे. हेमिस्फिअर प्रॉपर्टीज इंडिया लि. यांचेकडील पत्राचे अवलोकन व्हावे संबंधितांनी खालीलप्रमाणे नमुद केले आहे.<br><br>“ Inform that the quotation amounting Rs.39,67,75,857/- for the execution of the aforementioned work has been Approved. The Approval has been granted based on the comprehensive review of the quotation with meets all necessary technical, financial and procedural requirements in accordance with pcmcs standards.<br><br>In this Connection rquest to proceed with necessary step to Initiate the Infrastructure development work to ensure timely Commisment of work. वरील प्रमाणे अवलोकन केले असता मे. हेमिस्फिअर प्रॉपर्टीज इंडिया लि.यांनी भुखंड विकसनाकामी येणारी अंदाजपत्रकीय र.रु. ३९,६७,७५,८५७/- यास त्यांचे मुख्य आस्थपनेकडील मान्यता घेतलेली असून सदरची रक्कम मनपा कोषागारात भरणेस हि तयार आहेत. तथापि मे. हेमिस्फिअर प्रॉपर्टीज इंडिया लि. यांचे विनंतीनुसार इकडील विभागामार्फत निविदा प्रसिध्दी करणे व तद्नंतर कार्यारंभ आदेश येऊन तातडीने प्रत्यक्ष स्थळी काम चालू होणे व कामाची वेळोवेळी अदायगी होणेकरीता या कामास स्वतंत्र लेखाशिर्षक असणे आवश्यक आहे. सदरील कामास मनपा निधीतून देयके अदायगी करणेची आवश्यकता नसलेने स्वतंत्र लेखाशिर्ष करणे व त्यातुनच संबंधित कामाची देयके अदायगी करणे हे प्रत्यक्ष स्थळी चालु असलेल्या विकास कामास सुलभ व वेगाने होणेचे हिताचे आहे. उक्त अनुषंगाने ‘पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मौजे बोपखेल येथील हेमीस्फिअर प्रॉपर्टीज इंडिया लि.(भारत सरकार उपक्रम) या परिसरातील स.नं.१३३,१३६ ते १४१ पै.मधील मंजूर रेखांकनास पायाभूत सुविधा रस्ते, सीमाभिंत व भूखंड विकसित करणे”. या कामास “Works Deposit Contribution M/s. Hemisphere Properties India Ltd” हे स्वतंत्र लेखाशिर्ष ( Budget Head ) अंदाजपत्रकात समावेश करणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश** |

| | |
|---|---|
| | **क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ८४३** **विषय क्रमांक - ८४३**

**दिनांक - ०४/०२/२०२५** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ८४३<br>दिनांक -<br>०४/०२/२०२५ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र. नगररचना/१०/३९/२०२५ दि.०४/०२/२०२५ अन्वये, मनपाचे मौजे ताथवडे मधील सार्वजनिक, निमसार्वजनिक विभागातील एकुण क्षेत्र सुमारे १ हेक्टर ४४ आर जमिन रहिवास विभागात समाविष्ट करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेस मान्यता देणे बाबत. |
| ठराव क्र. ८४३<br>दिनांक -<br>०४/०२/२०२५ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र. नगररचना/१०/३९/२०२५ दि.०४/०२/२०२५ अन्वये, “पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ताथवडे गावाच्या विकास योजनेस महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१ ( १ ) अन्वये महाराष्ट्र शासन , नगरविकास विभाग अधिसूचना क्र. टीपीएस – १८१५/२०१२/ प्र. क्रं.-८४/१५/वि.यो. मंजुरी/नवि-१३, दि०६/०१/२०१७ व महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शासन निर्णय क्रं.-टिपीएस-१८१५/२०१२/प्र.क्रं.८४/१५/ई.पी.मंजूरी/नवि-१३ दि.०३/१०/२०१८ मंजुरी मिळालेली आहे.सह सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांनी कळविले आहे की, ‘प्रस्तुत प्रकरणी मा. आमदार श्री.सत्यजीत तांबे यांची विनंती विचारात घेऊन, विषयांकित मौजे ताथवडे ता. मुळशी जि. पुणे येथील सर्वे नंबर ३२/१३, ३२/१४, ३२/९/२ (part), ३१ (part) व ३२/१४/१ हि जागा सार्वजनिक निम- सार्वजनिक विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करणेसंबंधी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने जागेचे स्थान व परिस्थिती, अस्तिवातील बांधकाम व वापराचे अनुषंगाने विचार विनिमय करुन, जागेचा वापर बदल करणे संबंधी उचित निर्णय घेऊन महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये प्रस्ताव सादर केल्यास, सदर प्रस्तावावर शासनस्तरावर गुणवत्तेनुसार निर्णय घेण्यात येईल’. त्यास अनुसरून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मा.प्रशासक यांजकडील महापालिका सभा, ठराव क्रमांक ६७३, दिनांक ०६ ऑगस्ट २०२४ अन्वये पुढीलप्रमाणे ठरावास मान्यता देणेत आलेली आहे, “सदरहू शाळेच्या सभोवताली विकास योजनेमध्ये रहिवास वापर आहे. सदरहू जागेस ४५.०० मी. रस्ता असून एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीनुसार झोन हा R2 मध्ये येतो. R2 मध्ये सार्वजनिक - निम सार्वजनिक मधील सर्व वापर अनुज्ञेय आहेत. तसेच विद्यमान संस्था हि खाजगी असल्याने कोणता वापर करायचा याबाबतचा निर्णय संबंधित संस्थांचे अधिकार कक्षेत आहे.त्यामुळे भविष्यात शाळा सुरू ठेवून नकाशात दर्शविलेनुसार फक्त खुली जागेमध्ये (शाळा वापरत |

| | |
|---|---|
| | असलेले विद्यमान खेळाचे मैदान) कोणतीही बांधकाम परवानगी देता येणार नाही,या अटीस अधिन राहून सार्वजनिक - निमसार्वजनिक वापरा ऐवजी रहिवास वापर करणेची मान्यता देणेचा महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये प्रस्तावास मान्यता देणेत आलेली आहे." त्यानुसार उक्त अधिनियमातील तरतूदीप्रमाणे दि.२७/०९/२०२४ चे दै.सकाळ व दै.Times of India मध्ये तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र,भाग एक-पुणे विभागीय पुरवणी, दि.३-९ ऑक्टोबर २०२४ मध्ये पान क्र.१४-१५ वर नागरिकांचे सुचना व हरकती करिता सुचना प्रसिद्ध करणेत आलेली होती.<br><br>वरीलप्रमाणे नोटीस प्रसिद्ध झालेनंतर सुचना/हरकती मागविणेकरीता एक महिन्याची मुदत दि.२७/१०/२०२४ पर्यंत होती. दरम्यानच्या काळात विधानसभा निवडणूक-२०२४ आचारसंहीतेचा दि.१५/१०/२०२४ ते दि.२५/११/२०२४ पर्यंत ४२ दिवसांचा कालावधी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १४८ (अ) नुसार मुळ मुदतीमधून वगळलेस दि.०८/११/२०२४ रोजीपर्यंत सुचना/हरकतींचा कालावधी होता.<br><br>प्रसिद्ध केलेल्या नोटीसवर ४ हरकती महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या आहेत. प्राप्त हरकतींवर वैयक्तिक पत्र देऊन दि.२६/१२/२०२४ रोजी सुनावणी ठेवली असता सदर सुनावणीस एकही हरकतदार उपस्थित राहीला नाही. तसेच त्यामधील दोघांनी उपस्थित राहू शकणार नाही तरी आम्ही सादर केलेले लेखी म्हणणे अंतिम समजावे असा मेल पाठविला. तरी महानगरपालिकेने उक्त अधिनियमातील कलम ३७ अन्वये वैधानिक कार्यवाही पुर्ण केलेली असलेने प्रस्ताव शासनास सादर करणेस व अंतिम मंजूरीकरीता" मा.महापालिका सभेची मान्यता देणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

**मा.प्रशासक ठराव क्रमांक - ८४४** **विषय क्रमांक - ८४४**

**दिनांक - ०४/०२/२०२५** **खाते – मा.आयुक्त**

| | |
|---|---|
| ठराव क्र. ८४४<br><br>दिनांक -<br><br>०४/०२/२०२५ | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र. वैद्य/०३/कावि/६४/२०२५ दि. ०४/०२ /२०२५<br><br>अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कै.यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय व मनपाचे इतर रुग्णालय येथे Nerve Conduction Velocity (NCV) Study करण्याकरीता NCV तंत्रज्ञ व न्यूरॉलॉजिस्ट पदावर पॅनल पद्धतीने नियुक्ततीस कार्योत्तर मान्यता देणे बाबत. |
| ठराव क्र. ८४४<br><br>दिनांक - | मा.महापालिका आयुक्त, यांचेकडील पत्र क्र. वैद्य/०३/कावि/६४/२०२५ दि. ०४/०२ /२०२५ अन्वये, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये सद्यस्थितीत गिअन-बरे सिंड्रोम (Guillain-Barre Syndrome) या आजाराच्या बाधित रुग्णांची संख्या वाढत असल्याने मनपाच्या |

| | |
|---|---|
| ०४/०२/२०२५ | कै.यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय व इतर रुग्णालये येथे Nerve Conduction Velocity (NCV) Study करण्याकरीता NCV तंत्रज्ञ व न्यूरॉलॉजिस्ट यांची पॅनल पद्धतीने नेमणूक करणे आवश्यक आहे. Nerve Conduction Velocity (NCV) Study केल्याने गिअन-बरे सिंड्रोम या आजाराचे निदान करणे सोपे होईल. राज्य शासनाकडील व केंद्र शासनाकडील मार्गदर्शक सूचनांनुसार व वेळोवेळी मा.विभागीय आयुक्त स्तर व आरआरटी तज्ञांच्या बैठकीमध्ये गिअन-बरे सिंड्रोम आजाराचे निश्चित निदान करण्याकरिता Nerve Conduction Velocity (NCV) Study ही चाचणी वापरण्यात यावी असे सूचित करण्यात आलेले आहे.<br><br>कै.यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय येथे सद्यस्थितीत Nerve Conduction Velocity (NCV) Study करीताचे मशीन उपलब्ध आहे परंतु NCV तंत्रज्ञ व न्यूरॉलॉजिस्ट उपलब्ध नाहीत. त्यामुळे सदर तंत्रज्ञ व न्यूरॉलॉजिस्ट पॅनलवर नेमणूक करणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत गिअन-बरे सिंड्रोम (Guillain-Barre Syndrome) या आजाराच्या बाधित रुग्णांची संख्या वाढत असल्याने मनपाच्या कै.यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय व इतर रुग्णालये येथे Nerve Conduction Velocity (NCV) Study करण्याकरीता NCV तंत्रज्ञ व न्यूरॉलॉजिस्ट यांची पॅनल पद्धतीने थेट पद्धतीने नियुक्ती करुन त्यांना पॅनल पद्धतीने केलेल्या कामकाजापोटी प्रत्येक केसेसनुसार Nerve Conduction Velocity (NCV) Study मशीनचे Operating करिता तंत्रज्ञ (टेक्निशिअन) यांना र.रु. १०००/- व विशेषज्ञ संवर्गातील न्यूरॉलॉजिस्ट यांना प्रत्येक केसेसनुसार र.रु. १०००/- या प्रमाणे एकत्रीत मानधनावर नियुक्ती करणेस व सदर कामकाजाकरिता प्रत्यक्ष येणारा खर्च वैदयकीय विभागाकडील “अस्थायी अस्थापना” या लेखाशिर्षकामधून (सन २०२४–२०२५) करणेस मान्यता मिळुन गिअन-बरे सिंड्रोमच्या सद्यस्थितीतील उद्रेकाच्या परिस्थितीचा विचार करता तातडीक असलेने व सदरची बाब महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये नव्याने सुरु करण्यात येत असल्याने ही बाब धोरणात्मक असल्याने कार्योत्तर मान्यतेकामी मा.महापालिका सभेची मान्यता देणे आवश्यक असल्याने त्यास मा.प्रशासक यांची मंजूरी देणेत येत आहे. |
| **निर्णय** | **महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील आदेश क्रमांक. एस.सी.ओ.-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ३ मार्च २०२२ व कार्यभार स्वीकृती आदेश क्र.प्रशा/१८/कावि/५९२/२०२२ दिनांक १८/०८/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महापालिका सभेच्या अधिकारांचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजूरी दिली.** |

सही/-
**(चंद्रकांत पोपट इंदलकर)**
**नगरसचिव**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

**सही/-**
**(शेखर सिंह)**
**मा.प्रशासक**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**